# महाराष्ट्र शासन

# गृह विभाग अर्थसंकल्प : २०१५-१६

## समर्थन

### अर्थसंकल्प अध्ययन केंद्र

समर्थन – ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन समोर, वसई (पू),

जि. ठाणे – ४०१ २०८, दूरध्वनी : ०२५० – २३९० १०३

Email: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखरप्रभू
उपाध्यक्ष: श्री.टी.के.चौधरी
कार्याध्यक्ष: श्री. विवेक पंडित

**संपादक:**

**मुक्ता भारती**

**-विश्लेषक-**

**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन समोर, वसई (पू),
जि. ठाणे – ४०१ २०८
Email:
**samarthanmumbai97@gmail.com**
www.samarthanadvocacy.org

## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# गृह विभाग

## ठळक वैशिष्ट्ये

- १० वर्षाच्या आतील बालिकांवरील बलात्कारामध्ये २०१२ च्या तुलनेत २०१३ मध्ये ९०.५५टक्के वाढ.
- १४ ते १८ वयोगटाच्या स्त्रियांवरील बलात्कारामध्ये २०१२च्या तुलनेत २०१३ मध्ये ६१.९ टक्के वाढ.
- स्त्रियांवरील अत्याचाराचे ९१.५ टक्के गुन्हे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित.
- २०१२च्या तुलनेत २०१३ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ५३.८ टक्के वाढ व अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ३४.७टक्के वाढ आहे.
- तपासासाठी असलेल्या एकूण भा. दं. वि. गुन्ह्यांपैकी ६१.९ टक्के गुन्ह्यात तपास पूर्ण करण्यात आला. त्यापैकी ७२.५टक्के गुन्ह्यात दोषारोपपत्र पाठविले.
- सन २०१३ मध्ये राज्यात भा. दं. वि. गुन्ह्यांचे शाबितीचे प्रमाण १३.३टक्के आहे.
- २९५१८८९ व्यक्तींच्या (राज्याच्या लोकसंख्येच्या २.५टक्के) भा. दं. वि. खटल्यांची सुनावणी विविध न्यायालयांसमोर प्रलंबित.
- सन २०१३ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण जखमी पोलिसांपैकी ७६.१टक्के पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यात जखमी.
- सन २०१३ मध्ये राज्यात १६६२२ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. १३२४५ व्यक्ती रस्त्यावरील अपघातात मृत्यू पावल्या.
- सन २०१३ मध्ये संगणक / सायबर गुन्ह्यांत गतवर्षीच्या तुलनेत ६१.७ टक्के वाढ झाली.
- राज्यात सन २०१३ मध्ये १८४०२ वाहने चोरीस गेली व त्यापैकी २५टक्के वाहने मिळून आली.
- राज्यात सन २०१३ मध्ये १ लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६४ पोलीस पूणे ग्रामीण, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७१ पोलीस कोल्हापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.
- २०१३ मध्ये ३.५८ लाख दखलपात्र गुन्हे दाखल, २०१२चे तुलनेत ७.४टक्के वाढ.
- २०१३ या वर्षात भा. दं. वि. प्रमाणे २.३४ लाख व विशेष आणि स्थानिक कायद्यांप्रमाणे १.२४ लाख गुन्हे दाखल.
- दर ३ मिनिटास सरासरी २ दखलपात्र गुन्हे दाखल.

- भा. दं. वि. प्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति २ मिनिटास तर विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति ४ मिनिटास दाखल.
- राज्याचे भा. दं. वि. गुन्ह्यांचे प्रमाण २०१.६ आहे. सर्वाधिक प्रमाण यवतमाळ घटकामध्ये ४४१.९ (१ लाख लोकसंख्येशी)
- मागील वर्षापेक्षा भा. दं. वि. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्ह्यांत १५.६ टक्के वाढ.
- एकूण भा. दं. वि. चे प्रमाण गुन्ह्यांपैकी २.४४ टक्के भाग अल्पवयीन गुन्ह्यांचा.
- एकूण भा. दं. वि. चे गुन्ह्यांपैकी ३७.९ टक्के गुन्हे ९ मोठ्या शहरांमध्ये (आयुक्तालयांमध्ये) दाखल, त्यापैकी ३९.२ गुन्हे एकट्या मुंबई शहरात दाखल.
- दरोड्याचे गुन्ह्यात २०१२ च्या तुलनेत २०१३ मध्ये ५.०टक्के वाढ.
- २०१२ च्या तुलनेने २०१३ मध्ये जबरी चोरीचे गुन्ह्यात ४०.३ टक्के वाढ.
- स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत ४६.७९ टक्के वाढ . सर्वाधिक गुन्हे मुंबई शहरात (३००८) दाखल असून संपूर्ण महाराष्ट्राचे गुन्ह्यांचे प्रमाण (दर १ लाख स्त्री लोकसंख्येस) ४६.६६ तर सर्वाधिक गुन्ह्यांचे प्रमाण यवतमाळ येथे (१२९.६८).
- २०१२चे तुलनेत २०१३ मध्ये हुंड्यासाठी खून या गुन्ह्यात १७.०टक्के घट व विनयभंग या गुन्ह्यात १०६.७ टक्के वाढ.

## सन २०१३ मधील महाराष्ट्र राज्यातील गुन्हेगारीची भारतातील गुन्हेगारीशी तुलना

<u>भा. दं. वि. खालील दाखल गुन्ह्यांचा कल:</u>

- देशामध्ये भा. दं. वि. खालील एकूण २६,४७,७२२ गुन्हे दाखल असून, त्यापैकी महाराष्ट्र राज्यात २,३४,३८५ (८.९%) गुन्हे व मध्य प्रदेशात २,२७,४५३ (८.६%) एवढे गुन्हे दाखल आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार देशामध्ये भा. दं. वि. खालील दाखल गुन्ह्यांचे प्रमाण (क्राइम रेट-दर एक लाख लोकसंख्येस गुन्ह्यांची संख्या) (२१५.५) एवढे असून महाराष्ट्र राज्याचे गुन्हे प्रमाण (२०१.७) एवढे आहे,

<u>खून :</u>

- देशात खून या गुन्हे शीर्षकाखाली, दाखल गुन्ह्यांमध्ये प्रमुख राज्यांच्या तुलनेत उत्तर प्रदेश (५०४७) पहिल्या क्रमांकावर , बिहार (३४४१) दुसऱ्या स्थानावर, त्यानंतर महाराष्ट्र (२५१२) तिसऱ्या स्थानी आहे

<u>खुनाचा प्रयत्न :</u>

- देशात खुनाचा प्रयत्न या शीर्षकाखाली दाखल गुन्ह्यामध्ये उत्तर प्रदेश (५२५९) पहिल्या , बिहार (३८८९) दुसऱ्या, व पश्चिम बंगाल (३५२३) तिसऱ्या स्थानावर , तामिळनाडू (३००७) ४ थ्या तर महाराष्ट्र (२४२८) प व्या स्थानावर आहे.

अपहरण व पळवून नेणे :

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली उत्तर प्रदेश (१११८३), दिल्ली (६२९४), बिहार (५५७०), राजस्थान (४९८६) इत्यादी काही ५ राज्यानंतर महाराष्ट्रात (२६४०) गुन्हे दाखल आहेत.

जबरी चोरी :

- देशात जबरी चोरीचे महाराष्ट्र (९७४६), उत्तर प्रदेश (३५९१), तामिळनाडू (२१८६), कर्नाटक (२१५०) व मध्यप्रदेश (१८३२) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.

चोरी :

- देशातील मोठ्या शहरामध्ये चोरीच्या दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली शहर (२७९८२), बेंगलुरू (१०६४३), नंतर मुंबई शहर १०५६१ असा क्रम आहे.

घरफोडी

- देशात घरफोडीचे महाराष्ट्र (१८३२८), मध्यप्रदेश (११००७), आंध्रप्रदेश (९८२०) व उत्तर प्रदेश (६६८३) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १ला क्रमांक आहे.

दंगा :

- देशामध्ये दंगा या गुन्हे शीर्षकाखाली बिहार (११९३१), केरळ (१००४२), महाराष्ट्र (९६१०), कर्नाटक (७२३७) व पश्चिम बंगाल (६१४२) असे गुन्हे दाखल आहेत.

अन्यायाने विश्वासघात:

- अन्यायाने विश्वासघात या गुन्हे शीर्षकाखाली देशामध्ये उत्तर प्रदेश (४११४) नंतर महाराष्ट्र (२२०६), बिहार (१६८४), पश्चिम बंगाल (१५६४) व आंध्रप्रदेश (१५५५) असे गुन्हे दाखल आहेत.
- देशातील मोठ्या शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली मुंबई शहर (६९७), लखनौ (५१३), दिल्ली शहर (३५६), कोलकत्ता (३३७) व जयपूर (२९७) असे गुन्हे दाखल आहेत.

**ठकबाजी :**

- देशात या गुन्हे शीर्षकाखाली राजस्थान (२२७९६), आंध्रप्रदेश (१३०१५), उत्तर प्रदेश (११६६५), महाराष्ट्रात (१०२१५) व कर्नाटक (६५९८) असे गुन्हे दाखल आहेत.

**स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे**

- देशामध्ये स्त्रियांवरील अत्याचाराचे एकूण ३,०९,५४६ गुन्हे दाखल असून राज्यनिहाय दाखल गुन्हे व त्याचा वाटा, आंध्रप्रदेश ३२८०९ (१०.६%), उत्तर प्रदेश ३२५४६ (१०.५%), पश्चिम बंगाल २९८२६ (९.६%), राजस्थान २७९३३ (९.०%), महाराष्ट्र २४८९५ (८.० %) व मध्य प्रदेश २२०६१ (७.१%) असा आहे.

**बलात्कार:**

देशात बलात्काराचे मध्यप्रदेश ४३३५ (१२.९%), राजस्थान ३२८५ (९.७%), महाराष्ट्र ३०६३ (९.१%), उत्तर प्रदेश ३०५० (९.०%) व आसाम १९३७ (५.७%) असे गुन्हे दाखल आहेत.

**विनयभंग :**

देशात विनयभंगाचे दाखल गुन्हे व त्याचा राज्यनिहाय वाटा मध्यप्रदेश ८२५२ (११.७%), महाराष्ट्र ८१३२ (११.५%), उत्तर प्रदेश ७३०३ (१०.३%) , आंध्रप्रदेश ६९३० (९.८ %) असा आहे.

**लैंगिक छळ:**

देशात देशात लैंगिक छळ या गुन्हे शीर्षकाखाली आंध्रप्रदेश ४७०२ (३७.४ %) व महाराष्ट्र राज्यात २६३२ (२०.९ %) असे गुन्हे दाखल आहेत. या गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र राज्याचा ६वा क्रमांक आहे.

**बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे:**

देशात बालकांवरील अत्याचाराबाबतच्या एकूण दाखल ५८,२२४ गुन्ह्यांपैकी, दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, उत्तर प्रदेश ९८५७ (१६.९%), मध्य प्रदेश (८२४७ (१४.२ %), दिल्ली ७१९९ (१२.४ %), महाराष्ट्र ६४१० (११.० %), छत्तीसगड ३७३७ (६.४ %) व राजस्थान २८८८ (५.०%) असा आहे.

# राज्य अर्थसंकल्पात गृह विभागाचे स्थान

आलेख क्र. १.




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (टक्केवारीत) | ५.७४ | ४.७४ | ५.०५ | ५.५६ | ५.४१ | ५.५७ | ५.७९ | ५.८४ | ५.७७ | ६.०० |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१३-१४ या काळात गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.४६ टक्के एवढाच निधी उपलब्ध झाला.
- वर्ष २००७-०८ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ४.७४ टक्के दिसून येतो.
- वर्ष २०१३-१४ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ५.८४ टक्के इतके होते.
- वर्ष २०१३-१४ मध्ये खर्चाचे प्रमाण ५.८४ असून, वर्ष २०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजाचे प्रमाण हे ६.०० टक्के आहे. परंतु तेवढा निधी उपलब्ध होणार नाही हे मागील अनुभवावरून सिध्द होते.

## ऑन डयुटी आत्महत्या वाढल्या

### आठ वर्षात २४७ पोलीस : कामाच्या अतिरिक्त ताणामुळे स्वास्थ्यावर परिणाम

जानेवारी २००७ ते डिसेंबर २०१४ या कालावधीत २४७ पोलीसांनी आत्महत्या केली. त्यामध्ये फौजदारापासून आयपीएस दर्जापर्यंत ३३ अधिकाऱ्यांचा समावेश होता. त्यात पोलीस शिपाई ते सहाय्यक फोजदारापर्यंत २१४ जणांचा समावेश होता.

*-जमीर काझी, दैनिक लोकमत १९ जानेवारी २०१५*

**पोलीसांचे मंजूर संख्याबळ व प्रत्यक्ष संख्याबळ यामध्ये असलेली मोठी तफावत त्यामुळे सतत बंदोबस्तावर तैनात, कामाचा अतिरिक्त ताण, वरिष्ठांकडून वा सहकाऱ्याकडून होणारी पिळवणूक तसेच कौटुंबिक कलह ही या आत्महत्येची प्रमुख कारणे आहेत.**

# गृह विभागावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च

आलेख क्र. २.




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ४३६१ | ५३५१ | ४१९० | ५१७२ | ७२८६ | ८२९२ | १००९० | १२०४३ | १३३४१ | १४६०० |
| सुधारित अंदाज | ५१८६ | ४१२८ | ५३३५ | ६५५२ | ७६६० | ८५१६ | १०५५४ | १२१४० | १३३३४ | |
| प्रत्यक्ष खर्च | ४४५९ | ३९१२ | ५०८४ | ६५५५ | ७०९६ | ७७८६ | ९५८३ | १०९७९ | | |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००६-०७ ते २०१३-१४ पर्यंत गृह विभागाला प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.
- वर्ष २०१३-०१४ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १२,१४० कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. १०,९७९ कोटी (९० टक्के) आहे.
- वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीत गृह विभागाला सरासरी रु. ६,९३१ कोटी इतका निधी उपलब्ध झाल्याचे दिसते.

## पोलीस कोठडी बनतेय मृत्यूचा सापळा

सीआयडीचा तपास सुरुच: २०१४ मध्ये ४३ जणांचा मृत्यू; ७ वर्षात २२४ जणांनी गमावले प्राण

गेल्या ७ वर्षात राज्यभरातील विविध पोलीस ठाण्यांतील विविध कोठडीत तब्बल २२४ जणांचा मृत्यू झाला आहे. दरवर्षी त्याचे प्रमाण वाढत राहिले असून, २०१४ च्या अखेरपर्यंत सर्वाधिक ४३ जणांचा मृत्यू झाला आहे.

***-जमीर काझी (दै. लोकमत, ९ फेब्रुवारी, २०१५)***

**मान्यवरांचे मत:**

पोलीस कोठडीत वाढणाऱ्या मृत्यूच्या वाढत्या घटना चंतिाजनक असून त्याचा परिणाम खात्याच्या प्रतिमेवर होत आहे. त्यामुळे तपासकामासाठी एखाद्याला ताब्यात घेतल्यास त्याबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांची काटेकोरपणे खबरदारी घेतली पाहिजे. संशयितांची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यक उपचार व सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे.

***-डॉ. माधव सानप (निवृत्त पोलीस महानिरीक्षक)***

# गेल्या ६ वर्षात गृह विभागावर झालेला योजनांतर्गत खर्च सरासरी केवळ ३७१ कोटी रुपये

आलेख क्र.३




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेतर | ४८८४ | ६३२८ | ६८०८ | ७२८० | ८९६२ | १०५८९ | १२८६३ | १४०५९ |
| योजनांतर्गत | १९९ | २२७ | २८८ | ५०५ | ६२१ | ३९० | ४७० | ५४० |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०१४-१५ सुधारित अंदाज व वर्ष २०१५-१६ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००८-०९ ते २०१३-१४ या ६ वर्षांच्या काळात योजनांतर्गत निधी सरासरी केवळ रु. ३७१ कोटी उपलब्ध झाला तर योजनेतर निधी रु. ७ हजार ४७५ कोटी १६ लाख उपलब्ध झाले.
- वर्ष २०१३-१४ मध्ये रु. १० हजार ९७९ कोटी निधी उपलब्ध झाला त्यापैकी योजनांतर्गत उपलब्ध झालेला निधी रु. ३९० कोटी होता. एकूण अर्थसंकल्पात योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण ३.५९ टक्के होते तर योजनेतर खर्च रु. १० हजार ५८९ कोटी होता त्याचे एकूण अर्थसंकल्पातील प्रमाण ९४.४४ टक्के एवढे प्रचंड होते.
- गृह विभागाच्या एकूण अर्थसंकल्पाने वर्ष २०१५-१६ मध्ये रु. १४ हजार कोटींचा आकडा पार केला असला तरी योजनांतर्गत खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे.
- २६/११ व नंतर जुलै २०११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची गरज असून देखील योजनांतर्गत खर्च अधिक होणे गरजेचे असताना वर्ष २०१२-१३ चा प्रत्यक्ष खर्च व २०१३-१४ च्या सुधारित अंदाजाचा व २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा कल कायम दिसून येतो.

# पोलीस

> *"पोलीस हा जनतेच्या अनादराचा, गुरुवर्यांच्या टीकेचा, चित्रपटात विनोदाचा - टिंगल - टवाळीचा विषय आहे. वर्तमानपत्रातून त्याला कधीही श्रेय मिळत नाही. सरकारी वकील आणि न्यायाधीश यांच्या सहकार्याअभावी तो निराधार असतो आणि आदरणीय व्यक्तींकडून त्याला तिरस्कार मिळतो, अनेकविध प्रलोभने आणि धोके सतत त्याच्यासमोर उभेच असतात. तो जेव्हा कायद्याचा अंमल करतो तेव्हा त्याचा धिक्कार होतो आणि जेव्हा अंमल करीत नाही तेव्हा तो निलंबित होतो. त्याच्याकडून सैनिकाची, शांतीदूताची आणि शिक्षकाची अपेक्षा करीत असताना त्याला पगार मात्र रोजंदार मजूरापेक्षा कमीच दिला जातो."*
>
> \- ऑगस्ट वॉल्लीमोर.

## मुंबईवरील वाढत्या दहशतवादातून आम्ही कोणता धडा घेतला?

आलेख क्र.४




| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २६२९ | ३०८२ | ३३११ | ४२७२ | ६११७ | ६६४० | ७८३३ | ९४२० | १०४६९ | ११८५३ |
| सुधारित अंदाज | २७९० | ३३३३ | ३९२१ | ४९२३ | ६३३० | ६७१९ | ८२११ | ९४२३ | १०३४३ | |
| प्रत्यक्ष खर्च | २५७१ | ३०५० | ३७०५ | ५०३९ | ५८०७ | ६१४२ | ७२९३ | ८२२९ | | |

*(स्त्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश व लोकलेखा- मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०१४-१५ सुधारित अंदाज व २०१५-१६ अंदाजित खर्च)*

- २००६-०७ ते २०१३-१४ पर्यंत वर्ष २००९-१० वगळता पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.
- वर्ष २०१३-१४ मध्ये सुधारित अंदाज रु.९,४२३ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार १९४ कोटी कमी होऊन त्या वर्षातील खर्च रु. ८,२२९ कोटी इतका झाला आहे.
- वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाज रु. १०,३४३ व वर्ष २०१५-१६ मधील अर्थसंकल्पीय अंदाज रु. ११,८५३ कोटी इतके असले तरी हे अंदाज प्रत्यक्षात उतरणे महत्त्वाचे ठरेल.

# राज्याचा पोलिसांवरील सरासरी उपलब्ध निधी फक्त ३.५ टक्के

आलेख क्र. ५




*(स्त्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च)*
*वर्ष २०१४-१५ चे सु. अंदाज व वर्ष २०१५-१६ चे अर्थसंकल्पीय अंदाज )*

- ❑ वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ३.९२ टक्के दिसून येते.
- ❑ वर्ष २०१२-१३ च्या तुलनेत वर्ष २०१३-१४ मध्ये उपलब्ध झालेला निधी ०.०३ टक्क्यांनी घटला आहे.

# राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्च

तक्ता क्र. १ *(रु. कोटीत)*

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ३,९०८ | २,३०९ | ५९.०८ |
| २००६-०७ | ४,४५९ | २,५७१ | ५७.६५ |
| २००७-०८ | ३,९१२ | ३,०५० | ७७.९६ |
| २००८-०९ | ५,०८४ | ३,७०५ | ७२.८७ |
| २००९-१० | ६,५५५ | ५,०३९ | ७६.८७ |
| २०१०-११ | ७,०९६ | ५,८०७ | ८१.८३ |
| २०११-१२ | ७,७८६ | ६,१४२ | ७८.८८ |
| २०१२-१३ | ९,५८३ | ७,२४८ | ७६.१० |
| २०१३-१४ | १०,९७९ | ८,२२९ | ७४.९५ |
| २०१४-१५ (सु.अं) | १३,३३४ | १०,३४३ | ७७.५६ |
| २०१५-१६ (अ.अ.) | १४,६०० | ११,८३५ | ८१.०६ |

*स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च*

- ❑ वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ७४.१३ टक्के आहे म्हणजेच उर्वरित २५.८७ टक्के खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.
- ❑ वर्ष २००५-०६ ते वर्ष २०१३-१४ पर्यंत पोलीस या शिर्षावर सरासरी रु.४ हजार ९०० कोटी निधी उपलब्ध झाला.
- ❑ वर्ष २०१२-१३ शी तुलना करता वर्ष २०१३-१४ मध्ये गृह विभागाला उपलब्ध झालेल्या निधीत १२.७१ टक्के वाढ झाल्याचे दिसते. याचा अर्थ दहशतवादी हल्ल्याचा गृह विभागावर काहीच परिणाम झालेला दिसत नाही.

***पोलिसांवरील वाढता ताण : महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १७० पोलीस***

*महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी ६२ लाख एवढी असून २०१३ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ १,९७,५२६ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १७० पोलीस आहेत. तर एक लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६४ पोलीस अहमदनागर, तर ७१ पोलीस कोल्हापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत आहे.*

***- स्त्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे २०१३***

पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत मापदंड सुधारणा करण्याबाबत वर्ष २००३ मध्ये सराफ समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच पुढील ३ वर्षामध्ये प्रत्येक वर्षी नियुक्त करावयाची पोलीस कर्मचाऱ्यांची ११,००० पदे नियमित भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

***- अंदाज समितीची शिफारस***

# बंदिवासातील पोलीस यंत्रणा

पोलीसांचे अधिकार व कर्तव्ये, पोलीस आणि जनता यांचे परस्पर संबंध, पोलिसांचा होणारा राजकीय वापर या मुद्द्यांचा विचार करता १५ नोव्हेंबर १९७७ मध्ये राष्ट्रीय पोलीस आयोगाची स्थापना करण्यात आली. परंतु राज्यकर्त्यांनी मात्र या आयोगाच्या शिफारशींना केराची टोपलीच दाखविली आहे. पोलिसांवरील गैरवाजवी राजकीय हस्तक्षेप रोखणे हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून शासनातर्फे राज्य सुरक्षा मंडळ व पोलीस अधिकाऱ्यांविरोधी तक्रारीची दखल घेण्यासाठी पोलीस तक्रार प्राधिकरणाची २५ जुलै २००८ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची अंमलबजावणी अजूनही झालेली नाही तसेच शासनाने पोलीस आस्थापना मंडळाची अधिसूचना देखील २५ जुलै २००८ रोजी जारी केली होती. अशाप्रकारच्या यंत्रणा या इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, कॅनडा, दक्षिण आयर्लंड येथे कार्यरत आहेत.

**अ) पोलीस आस्थापना मंडळ:**

सदर मंडळ समाधानकारक काम करीत असून अनेक ठिकाणी पोलीस उपनिरीक्षकाच्या दर्जाहून खालील अधिकाऱ्यांच्या बदल्या या पोलीस आस्थापना मंडळामार्फत होतात. या शासन निर्णयानुसार पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या बदल्या किंवा इतर सेवाशर्ती या आस्थापना मंडळाने करावयाच्या आहेत त्यापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नाही.

जिल्ह्यांतर्गत बदल्याबाबतचे अधिकार पोलीस अधिक्षक, अपर पोलीस अधिक्षक, पोलीस उपअधिक्षक (गृह) यांच्या आस्थापना मंडळामार्फत व्हावे असे आस्थापना मंडळ निर्माण करावे असे राज्यातील अनेक पोलीस अधिकाऱ्यांचे मत आहे.

**ब) पोलीस तक्रार प्राधिकरण :**

पोलीस तक्रार प्राधिकरण राज्य पातळीवर व जिल्हा पातळीवर स्थापन करण्यात आला आहे. असे असले तरी प्रत्यक्षात राज्यात व कोणत्याही जिल्ह्यात अंमलबजावणी झालेली नाही.

# गुन्हे

## ९ प्रमुख शहरात ८८ हजार ८८२ गुन्ह्यांची नोंद
## एकूण राज्याच्या तुलनेत ३८ टक्के
## (वर्ष २०१३)

तक्ता क्र. २

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | राज्यातील एकूण गुन्हे | ९ शहरातील गुन्हे | ९ शहरांतील गुन्ह्यांचे राज्यातील गुन्ह्यांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | खून | २५१२ | ६५० | २५.८८ |
| २) | खुनाचा प्रयत्न | २४२८ | ६९१ | २८.४६ |
| ३) | सदोष मनुष्यवध | २०३ | ३९ | १९.२१ |
| ४) | बलात्कार | ३०६३ | १००९ | ३२.९४ |
| ५) | पळवून नेणे व अपहरण | २६४० | १२०८ | ४५.७६ |
| ६) | दरोडा | ८३३ | १९३ | २३.१७ |
| ७) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | २६३ | १२७ | ४८.२९ |
| ८) | जबरी चोरी | ९७४६ | ६०५८ | ६२.१६ |
| ९) | घरफोडी | १८३२८ | ८५७५ | ४६.७९ |
| १०) | चोरी | ५२६७० | २४९०३ | ४७.२८ |
| ११) | गर्दी - मारामारी (दंगल) | ९६१० | २०५८ | २१.४२ |
| १२) | अन्यायाने विश्वासघात (Criminal Breach of Trust) | २२०६ | ११४७ | ५१.९९ |
| १३) | फसवणूक | १०२१५ | ५३९८ | ५२.८४ |
| १४) | बनावट नाणी | २४२ | १३७ | ५६.६१ |
| १५) | जाळपोळ | ११९७ | २१६ | १८.०५ |
| १६) | दुखापत | ३०७९६ | ९३१६ | ३०.२५ |
| १७) | हुंडाबळी | ३२० | ७१ | २२.१९ |
| १८) | विनयभंग | ८१३२ | २६९९ | ३३.१९ |
| १९) | छेडछाड (लैंगिक छळ) | २६३२ | ८९५ | ३४.०० |
| २०) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | ८५४२ | २१५९ | २५.२८ |
| २१) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | १२५७५ | २५३१ | २०.१३ |
| २२) | इतर भा. दं. वि. घुन्हे | ५५२३२ | १८७४२ | ३३.९३ |
| | **एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे** | **२३४३८५** | **८८८२२** | **३७.९०** |

*(९ प्रमुख शहरे :नागपूर,पुणे,ठाणे,मुंबई,नाशिक,औरंगाबाद,सोलापूर,नवी मुंबई, अमरावती(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- महाराष्ट्रातील नऊ मोठ्या शहरात (नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई आणि अमरावती) पोलीस आयुक्तालय पध्दती आहे.
- सन २०१२ नुसार या नऊ प्रमुख शहराची लोकसंख्या ३ कोटी १८ लाख आहे.
- एकूण भा.द.वी. गुन्ह्यांपैकी ३८ टक्के गुन्ह्यांची नोंद ही या नऊ प्रमुख शहरात झालेली आहे.
- एकूण भा.द.वी. गुन्ह्यांपैकी वर्ष २०१३ मध्ये चोरी या प्रकाराखाली राज्यात ५२,६७० गुन्ह्यांची नोंद झाली असून ९ प्रमुख शहरात २४ हजार ९०३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

# मुंबईत घडलेले गुन्हे ३४ हजार ८४०

## ९ प्रमुख शहरात मुंबईचा वाटा ३९ टक्के

**वर्ष २०१३ मध्ये मुंबई शहरात घडलेले गुन्हे:**

तक्ता क्र. ३

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | ९ शहरातील गुन्हे | मुंबई शहरातील गुन्हे | मुंबईचे ९ शहराशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | खून | ६५० | १७० | २६.१५ |
| २) | खुनाचा प्रयत्न | ६९१ | १९० | २७.४९ |
| ३) | सदोष मनुष्यवध | ३९ | ८ | २०.५ |
| ४) | बलात्कार | १००९ | ३९१ | ३८.७५ |
| ५) | पळवून नेणे व अपहरण | १२०८ | ३८१ | ३१.५३ |
| ६) | दरोडा | १९३ | ४१ | २१.२४ |
| ७) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | १२७ | १९ | १४.९६ |
| ८) | जबरी चोरी | ६०५८ | २७५७ | ४५.५१ |
| ९) | घरफोडी | ८५७५ | २९३६ | ४८.४६ |
| १०) | चोरी | २४९०३ | १०५६१ | ४२.४० |
| ११) | गर्दी-मारामारी | २०५८ | ३८५ | १८.७० |
| १२) | अन्यायाने विश्वासघात (Criminal Breach of Trust) | ११४७ | ६९७ | ६०.७६ |
| १३) | फसवणूक | ५३९८ | २१३४ | ३९.५३ |
| १४) | बनावट नाणी | १३७ | ४८ | ३५.०३ |
| १५) | जाळपोळ | २१६ | ४७ | २१.७५ |
| १६) | दुखापत | ९३१६ | ३९२२ | ४२.०९ |
| १७) | हुंडाबळी | ७१ | २१ | २९.५७ |
| १८) | विनयभंग | २६९९ | ११६३ | ४३.०९ |
| १९) | छेडछाड | ८९५ | ४४४ | ४९.६० |
| २०) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | २१५९ | ६०२ | २७.८८ |
| २१) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | २५३१ | ५८६ | २३.१५ |
| २२) | इतर भा. दं. वि. घुन्हे | १८७४२ | ७३३७ | ३९.१४ |
| | **एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे** | **८८८२२** | **३४८४०** | **३९.२२** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- राज्यातील प्रमुख नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती या नऊ शहरांमधील नोंदविलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण पहाता एकट्या मुंबई शहरातील गुन्ह्यांचे प्रमाण हे ३९.२२ टक्के इतके आहे.

- राज्यातील प्रमुख नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती या नऊ शहरांशी तुलना करता मुंबईमध्ये अन्यायाने विश्वासघात (Criminal Breach of Trust) या गुन्ह्यांचे प्रमाण ६०.७६ टक्के आणि विनयभंग या गुन्ह्यांचे प्रमाण ४७.८१ टक्के असून ते सर्वाधिक आहे.

- राज्यातील प्रमुख नऊ शहरांशी (नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती) तुलना करता मुंबईमध्ये नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये फसवणुकीबद्दलच्या गुन्ह्याचे प्रमाण ३९.५३ टक्के तर दुखापतीचे प्रमाण ४२.०९ टक्के , चोरीचे प्रमाण ४२.४० टक्के व बलात्काराचे प्रमाण हे ३८.७५ टक्के दिसून येते.

# अनुसूचित जाती व जमातींच्या नागरिकांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले

# अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्हे १ हजार ६७८

### अ) अनुसूचित जाती :

तक्ता क्र. ४

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००८ शी २०१३ ची % | २०१२शी २०१३ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | | |
| खून | २३ | २७ | २४ | २६ | ३६ | ४० | ७३.९१ | ११.११ |
| बलात्कार | ९३ | १०५ | ८९ | ९५ | ९७ | १७९ | ९२.४७ | ८४.५४ |
| अपहरण व पळवून नेणे | २४ | १० | २५ | १२ | २३ | ३३ | ३७.५० | ४३.४८ |
| दरोडा | १७ | २० | २२ | १६ | १६ | २६ | ५२.९४ | ६२.५० |
| जबरी चोरी | ०६ | ८ | २० | १२ | १३ | २२ | २६६.६७ | ६९.२३ |
| जाळपोळ | १० | ८ | १२ | ७ | ९ | १० | ०.०० | ११.११ |
| दुखापत | ९७ | ५६ | ७७ | ८४ | ८१ | १६७ | ७२.१६ | १०६.१७ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | २० | २४ | २५ | १० | ५ | २१ | ५.०० | ३२०.०० |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | ३३४ | २९१ | ३१९ | ३०४ | २६७ | २७७ | -१७.०७ | ३.७५ |
| इतर गुन्हे | ५६८ | ५४७ | ५१९ | ५७७ | ५४४ | ९०३ | ५८.९८ | ६५.९९ |
| **एकूण** | **११९२** | **१०९६** | **११३२** | **११४३** | **१०९१** | **१६७८** | **४०.७७** | **५३.८०** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- वर्ष २००८ शी तुलना करता वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये प्रामुख्याने खुनाच्या प्रमाणात ७३.९१ टक्के, बलात्काराच्या प्रमाणात ९२.४७ टक्के तर दरोड्यात ५२ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर जबरी चोरीत २६७ टक्के वाढ झाली आहे.
- वर्ष २०१२ शी तुलना करता वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये अपहरण व पळवून नेणे या गुन्ह्यात ४३.४८ टक्के इतकी वाढ झालेली आहे. तर खुनासारख्या गुन्ह्यात ११.११ टक्के इतकी वाढ झाली आहे.
- अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांच्या प्रकारामध्ये अनु. जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ठरणाऱ्या गुन्ह्यांची संख्या पहाता वर्ष २००८ शी तुलना करता वर्ष २०१३ मधील या कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण १७.७ टक्क्यांनी घटले आहे.
- वर्ष २०१३ मध्ये घडलेल्या अनुसूचित जातीवरती झालेल्या अत्याचारात अनु.जाती/जमाती प्रतिबंधक कायद्यांतर्गत २७७ गुन्ह्यांची नोंद झाली असून बलात्काराच्या १७९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.

# अनुसूचित जमातींवरील अत्याचारांबाबत वर्ष २०१३ मध्ये ४१५ गुन्हे दाखल

## ब) अनुसूचित जमाती :

तक्ता क्र. ५

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००८ शी २०१३ ची % | २०१२ शी २०१३ ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | | |
| खून | ११ | ८ | ९ | १६ | ११ | ७ | -३६.३६ | -३६.३६ |
| बलात्कार | ४६ | ५० | ४६ | ५७ | ५६ | ९१ | ९७.८३ | ६२.५० |
| अपहरण व पळवून नेणे | ७ | १ | ८ | ११ | ७ | ९ | २८.५७ | २८.५७ |
| दरोडा | ३ | १ | १ | ३ | ४ | ६ | १००.०० | ५०.०० |
| जबरी चोरी | १ | १ | १ | २ | ३ | २ | १००.०० | -३३.३३ |
| जाळपोळ | ८ | ६ | ७ | ४ | १ | ५ | -३७.५० | ४००.०० |
| दुखापत | १८ | ६ | ११ | १८ | १७ | २९ | ६१.११ | ७०.५९ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | ० | ० | ० | ० | १ | ८ | ८००.०० | ७००.०० |
| अनु.जाती/जमाती प्रतिबंधक कायदा | ४७ | ३७ | ५५ | ६१ | ५३ | ४५ | -४.२६ | -१५.०९ |
| इतर गुन्हे | १२७ | ११४ | १५४ | १४९ | १५५ | २१३ | ६७.७२ | ३७.४२ |
| **एकूण** | **२६८** | **२२४** | **२९२** | **३२१** | **३०८** | **४१५** | ५४.८५ | **३४.७४** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- वर्ष २०१२शी तुलना करता वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या विविध गुन्ह्यांपैकी नागरी हक्क सरक्षण कायद्यांतर्गत गुन्ह्यात या गुन्ह्यामध्ये ७०० टक्के वाढ झाली आहे.
- वर्ष २००७ ची वर्ष २०१२शी तुलना करता अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये दरोडा या गुन्ह्यामध्ये १०० टक्क्यांनी वाढ झाली तर तर जबरी चोरीचे प्रमाण १०० टक्क्यांने वाढले आहे.
- वर्ष २०१२ मध्ये अनुसूचित जमातीवरील गुन्हे ५३ नोंदविले गेले होते. वर्ष २०१३ मध्ये त्यात ८ ने घट होऊन ४५ इतके झाले आहे.
- **वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जमातिवर बलात्काराची ९१ प्रकरणे घडली.**

## ॲट्रोसिटी गुन्ह्यांतील ९१ टक्के आरोपी निर्दोष

### वर्ष २०१४ मध्ये ७ हजार ५८२ प्रकरणं प्रलंबित

अनेक दिव्य पार पाडत दलित-आदिवासींवरील अत्याचारांचे खटले न्यायालयापर्यंत पोहोचतात. परंतु त्यापैकी बहुतांश आरोपींची निर्दोष मुक्तता होते. मागील ४ वर्षांत अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार न्यायालयात सुनावणी झालेल्या एकूण खटल्यांपैकी केवळ ६ ते ८ टक्के गुन्ह्यात आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली. आरोपींची मुक्तता निर्दोष मुक्तता झालेल्या खटल्यांचे प्रमाण ९१ ते ९३ टक्के आहे. चार वर्षांत केवळ ३ हजार २४५ खटल्यांची सुनावणी पूर्ण झाली तर वर्ष २०१४ मध्ये ७ हजार ५८२ प्रकरणं प्रलंबित होते.

तक्ता क्र.६

**न्यायालयात प्रलंबित प्रकरणे**

| वर्ष | एकूण निर्णय | शिक्षा | शिक्षेचे प्रमाण | निर्दोष मुक्तता | रद्द/एकत्रित केलेली प्रकरणं | प्रलंबित प्रकरणं | नवीन दाखल | एकूण प्रलंबित प्रकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११ | ९२६ | ५५ | **५.९३** | ८४८ | २३ | ५०२७ | ११७३ | **६२००** |
| २०१२ | ९४२ | ५५ | **५.८३** | ८७६ | ११ | ५२७७ | ११३५ | **६४१२** |
| २०१३ | ८०८ | ६० | **७.४२** | ७३३ | १५ | ५४४२ | १५५७ | **६९९९** |
| २०१४ | ५६९ | ४५ | **७.९०** | ५१६ | ८ | ६२२१ | १३६१ | **७५८२** |

*-सोनाली शिंदे दै. सकाळ १ जानेवारी २०१५*

# तपासासाठी प्रलंबित गुन्हे १ लाख ३२ हजार ९१३

## गुन्ह्यांची निर्गती व तपासासाठी प्रलंबित असलेले गुन्हे २०१३

तक्ता क्र. ७

| अ.क्र. | गुन्ह्यांचे प्रकार | तपासासाठी एकूण गुन्हे | तपासकार्य नाकारलेले व तपास न लागलेले गुन्हे | तपासकार्य पूर्ण झालेले गुन्हे/तपासाअंती निर्गती करण्यात आलेले गुन्हे | तपासासाठी प्रलंबित गुन्हे |
|---|---|---|---|---|---|
| १. | खून | ३९०५ | ० | २५२३ | १३८२ |
| २. | खुनाचा प्रयत्न | ३६८६ | ० | २२४२ | १४४४ |
| ३. | सदोष मनुष्यवध | २९६ | ० | १७७ | ११९ |
| ४. | बलात्कार | ३८८८ | १ | २६९० | ११९७ |
| ५. | अपहरण व पळवूण नेणे | ४०१९ | ० | २०९३ | १९२६ |
| ६. | दरोडा | १३७७ | १ | ७१२ | ६६४ |
| ७. | दरोड्याची पूर्वतयारी व त्यासाठी एकत्र जमणे. | ४३८ | ० | २६६ | १७२ |
| ८. | जबरी चोरी | १३३१९ | ० | ८०४४ | ५२७५ |
| ९. | घरफोडी | २८६७० | ० | १६३७४ | १२२९६ |
| १०. | चोरी | ८७६४७ | ३ | ४८२३८ | ३९४०४ |
| ११. | गर्दी – मारामारी (दंगल) | १३२९५ | ० | ८९२७ | ४३६६ |
| १२. | अन्यायाने विश्वासघात (Criminal Breach of Trust) | ५०५६ | १ | १८९१ | ३१६३ |
| १३. | ठकबाजी (लुबाडणूक) | २११३० | २ | ९०५३ | १२०६९ |
| १४. | बनावट नाणी | ११५३ | ० | २५३ | ९०० |
| १५. | जाळपोळ | १७३९ | ० | ११२९ | ६१० |
| १६. | दुखापत | ४०८६६ | १ | २९९३४ | १०९३१ |
| १७. | हुंडाबळी | ४३४ | ० | ३३४ | १०० |
| १८. | विनयभंग | ९७४५ | ० | ६५९८ | ३१४७ |
| १९. | छेडछाड | ३३५० | ० | २२१४ | ११३६ |
| २०. | पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून छळ | ११०१९ | ३ | ७६४९ | ३३६३ |
| २१. | निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत | १७४८७ | १ | १२८४८ | ४६३८ |
| २२. | इतर भा.दं.वि. गुन्हे | ७६३८० | ४ | ५१७६२ | २४६११ |
| | **एकूण गुन्हे** | **३४८८९९** | **१७** | **२१५९५१** | **१३२९१३** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- महाराष्ट्र राज्यात वर्ष २०१३ मध्ये १ लाख ३२ हजार ९१३ गुन्हे प्रलंबित होते.
- वर्ष २०१३ मध्ये भा.दं.वि. खालील २ लाख १५ हजार ९५१ गुन्ह्यांची तपासाअंती निर्गती करण्यात आली.
- वर्ष २०१३ मध्ये मागील वर्षाच्या प्रलंबित गुन्ह्यांसह तपासासाठी एकूण गुन्हे ३ लाख ४८ हजार ८९९ इतके होते.

## पोलिसांविरुध्द तक्रारींची संख्या ७ हजार २८०(वर्ष २०१३)

तक्ता क्र. ८

| वर्ष | पोलिसांविरुध्द तक्रारी | खातेनिहाय चौकशी | दंडाधिकाऱ्या मार्फत चौकशी | न्यायालयीन चौकशी | खोट्या तक्रारी/निराधार आरोप | दाखल गुन्हे | तपासाअंती खातेनिहाय कारवाईची शिफारस | न्यायालयात पाठविलेले दोषारोप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१० | ४९०६ | ३७० | १९ | ५८ | ३७१३ | ४१३ | ९० | १५९ |
| २०११ | ५५४१ | ५५८ | २ | ७३ | ३८४२ | ३९९ | १५९ | १९१ |
| २०१२ | ६९२५ | ३९८ | १४ | ६५ | ४५४९ | ३८० | ९९ | १७३ |
| २०१३ | ७२८० | ९५१ | १ | ८६ | ४१७२ | ४४२ | २३० | १७२ |

*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे -२०१३)*

- वर्ष २०१० शी तुलना करता वर्ष २०१२ मध्ये २ हजार ३७४ पोलिसांविरुध्दच्या तक्रारींमध्ये वाढ झालेली आहे. तर वर्ष २०१२ शी तुलना करता २०१३ मध्ये ३५५ ने वाढ झाली आहे.
- पोलीसांवरील खोट्या तक्रारींचे प्रमाणही वाढले असून वर्ष २०१३ मध्ये ४ हजार १७२ खोट्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.
- वर्ष २०१३ मध्ये ९५१ प्रकरणांतर्गत पोलिसांवर खाते निहाय कारवाईची शिफारस करण्यात आली होती.

वर्ष २०१३ मध्ये १७२ प्रकरण न्यायालयात पाठविण्यात आली.

# राज्यात १ लाख ३३ हजार ४५१ पोलीस शासकीय निवासापासून वंचित.

**महाराष्ट्र राज्य पोलीस संख्याबळ आणि त्यांना उपलब्ध झालेली शासकीय निवासस्थाने**

तक्ता क्र.९

| २१ फेब्रुवारी, २०१५ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| **पद** | **संख्याबळ** | **उपलब्ध निवासस्थाने** | **निवासस्थान नसलेले** | **निवासस्थाने नसलेल्यांची टक्केवारी** |
| पोलीस अधिकारी | २०,५२३ | ५,६६५ | १४,८५८ | ७२.४० |
| पोलीस कर्मचारी | १,९९,४४३ | ८०,८५० | १,१८,५९३ | ५९.४६ |
| **एकूण** | **२,१९,९६६** | **८६,५१५** | **१,३३,४५१** | **६०.६७** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २१ फेब्रुवारी, २०१५*

- महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात २ लाख १९ हजार ९६६ एवढी पोलीसांची संख्या असून त्यापैकी केवळ ८६ हजार ५१५ (३९.३३%) अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे शासकीय निवासस्थाने आहेत.
- राज्यातील २० हजार ५२३ अधिकाऱ्यांपैकी केवळ ५ हजार ६६५ अधिकाऱ्यांना शासन निवासस्थाने देऊ शकले याचा अर्थ आजही ७२% अधिकारी हे शासकीय निवासस्थानांपासून वंचित आहेत.
- राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या १ लाख ९९ हजार ४४३ आहे. त्यापैकी केवळ ८० हजार ८५० पोलीस कर्मचाऱ्यांना शासन निवासस्थान उपलब्ध करून देऊ शकले. तर आजही १ लाख ३३ हजार ४५१पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध नाहीत.

# २० हजार २६४ मुंबई पोलीस आजही घरांच्या प्रतिक्षेत

**मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रत्यक्ष संख्याबळ व त्यांना उपलब्ध झालेली निवासस्थाने**

तक्ता: क्र.१०

| ३ मार्च, २०१५ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| **पद** | **संख्याबळ** | **उपलब्ध निवासस्थाने** | **निवासस्थान नसलेले** | **निवासस्थान नसलेल्यांची टक्केवारी** |
| पोलीस अधिकारी | २१५२ | २३०० | -१४८ | ०.०० |
| पोलीस कर्मचारी | ३९५४२ | १९२७८ | २०२६४ | ५१.०० |
| **एकूण** | **४१६९४** | **२१५७८** | **२०२६४** | **४८.२४** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, ३ मार्च, २०१५*

- मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्राप्त झालेल्या माहितीनूसार मुंबई पोलीसांचे प्रत्यक्ष संख्याबळ ४१ हजार ६९४ एवढे आहे. त्यामध्ये २ हजार १५२ पोलीस अधिकारी असून ३९ हजार ५४२ पोलीस कर्मचारी आहेत.
- राज्यात २० हजार २६४ पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसली तरी २ हजार १५२ पोलीस अधिकाऱ्यांना २३०० निवासस्थाने उपलब्ध आहेत. प्रत्यक्ष संख्याबळापेक्षा १४८ अधिकची निवासस्थाने उपलब्ध आहेत.
- ४१ हजार ६९४ पोलीसांना २१ हजार ५७८ निवासस्थाने उपलब्ध आहेत. २० हजार ११६ पोलीसांना आजही शासकीय निवासस्थान उपलब्ध नाहीत

# राज्यातील मानवी हक्क आयोगात १७ हजार ७५ प्रकरण प्रलंबित

**वर्ष २०१५-१६ मध्ये दाखल झालेल्या १८ हजार ३०२ प्रकणांपैकी १७ हजार ७५ (९३%)प्रकरण प्रलंबित**

तक्ता क्र.११

| वर्ष | एकूण दाखल असलेली प्रकरणं | सुनावणी न होता बरखास्त केलेली प्रकरणं | सुनावणी झाल्यानंतर निकालात काढलेली प्रकरणं | एकूण निकालात काढलेली प्रकरणं | वर्षाखेरीस प्रलंबित प्रकरणं | एकूण दाखल प्रकरणात प्रलंबित प्रकरणांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | ८५३६ | ३९६६ | १५२६ | ५४९२ | ३०४४ | ३५.६६ |
| २०११-१२ | ८६५४ | ३१८२ | ५२५ | ३७०७ | ४९४७ | ५७.१६ |
| २०१२-१३ | १०६२७ | ० | ० | ० | १०६२७ | १००.०० |
| २०१३-१४ | १५७९७ | १०८७ | १८७ | १२७४ | १४५२३ | ९१.९३ |
| २०१४-१५ | १८८२३ | ११६३ | ३०१ | १४६४ | १७३५९ | ९२.२२ |
| १०१५-१६ | १८३०२ | ८५७ | १९ | ८७६ | १७०७५ | ९३.२९ |
| - | - | १०२५५ | २५५८ | १२८१३ | - | - |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २५ मार्च, २०१५*

- **माहितीच्या अधिकाराखाली मागविलेल्या माहितीत असे आढळून आले की फेब्रुवारी २०१५ पर्यंतची १७ हजारांपेक्षा जास्त प्रकण आज न्यायाच्या अपेक्षेने मानवी हक्क आयोगाच्या कपाटात बंद आहेत.**
- वर्ष २०१२-१३ मध्ये आयोगाने एकही प्रकरण निकालात काढलेले नाही.त्यामुळे वर्ष २०११-१२ मध्ये ४ हजार ९४७ प्रलंबित प्रकरणं होती त्यात २०१२-१३ मध्ये ५ हजार ६८०ने वाढ होऊन प्रलंबित प्रकरणांची संख्या १० हजार ७२७वर पोहचली.
- **वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ या ३ वर्षाच्या कालावधीत सरासरी १० टक्के प्रकरणांनाच मानवी हक्क आयोग न्याय देऊ शकले.**
- **वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या ५ वर्षाच्या कालावधीत १० हजार २५५ प्रकरणं सुनावणी न होताच बरखास्त करण्यात आली. तर केवळ २ हजार ५५८ प्रकरणांवर आयोगात सुनावणी झाली.**

## राज्य मानवी हक्क आयोगाच्या संकेत स्थळाची सध्याची स्थिती

- ५ सप्टेंबर, २०११ रोजी संकेतस्थळाची सुरुवात केली गेली परंतु आज २०१५ चा मार्च महिना उजाडला तरिही या संकेस्थळावर कोणत्याही स्वरुपाची माहिती अद्यावत केलेली नाही.
- महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने आपले संकेतस्थळ तर सुरु कले आहे परंतु मानवी हक्क आयोगाबाबतची कोणतीच माहिती अद्यावत नाही तसेच जी थोडीबहुत माहिती आहे ती वर्ष १० डिसेंबर, २०१२ मधील मानवी हक्क दिनाबाबत आहे.
- संकेतस्थळावर मानवी हक्क आयोगाचे अहवाल देखील ठेवलेले नाही. तसेच बातम्या व चालु घडामोडी याबाबतची माहिती २०१२ मधील म्हणजे २ वर्षा अगोदरची ठेवलेली आहे.
- देशातील राज्य निहाय मानवी हक्क आयोगांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नाही. तसेच देशाच्या मानवी हक्क आयोगाबद्दल देखील माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.
- मानवी हक्क आयोगाच्या संकेत स्थळावर राज्यातील लोकल्याणकारी संस्था, सामाजिक संस्थांचे नाव पत्ते, निरनिराळ्या प्राधिकरणाचे मदत क्रमांक देणे अपेक्षित असते परंतु अशा स्वरुपाची कोणतीही माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली नाही.
- मानवी हक्क कायद्या संदर्भात १९९३ चा कायदा व त्यात झालेल्या सुधारणा, २००० साली तयार केलेल नियम व २००१ व २०११ मध्ये तयार केलेल्या अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध करणे गरजेचे होते. परंतु ही माहितीच संकेतस्थळावर उपलब्ध केलेली नाही.